Vol 5 Issue 10 Nov 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 10 | Nov - 2015

# भारत – राजकारणाची एक (अ)समृध्द अडगळ

मेघराज एकनाथ औटी
राज्यशास्त्र विभाग, एस. एस. जी. एम कॉलेज, कोपरगाव. ता. कोपरगाव, जि. अहमदनगर

**सारांश :**

भारत राजकारणाची एक (अ)समृध्द अडगळ हे शिर्षक काहिसे भालचंद्र नेमाडयांच्या हिंदू कांदबरीच्या शिर्षकाशी साधर्म्य साधतांना दिसत असले तरीही अर्थाअर्थी त्यांचा काहिही संबंध नाही. कारण त्यांची समृध्द अडगळ हि हिंदू धर्माशी व त्यातील विविधता असलेल्या संस्कृतीशी संबंधित आहे. तर माझ्या या शिर्षकातील (अ)समृध्द अडगळ हि भारतीय राजकारणाशी संबंधित आहे. व ती संपुर्ण भारतासंदर्भात आहे. कारण भारतात जितकी सामाजीक, सांस्कृतिक,भाषीक, धार्मिक, वांशिक विविधता आहे. तितक्याच मोठया प्रमाणात विविधता हि राजकारणातही निर्माण झालेली बघायला मिळते. कारण समाजशास्त्रीय दृष्टया विचार केला तर असे दिसून येईल कि प्रत्येक व्यक्ती हा एक स्वतंत्र राजकीय एकक असतो. व त्याचे व्यक्तीमत्वही इतरांपेक्षा थोडेशे तरी वेगळे असलेले बघायला मिळते. व त्याचप्रमाणे त्यांच्यावरती झालेले राजकीय संस्कारही भीन्नभीन्न स्वरुपाचे झालेले असतात. त्यामुळे भारतीय राजकारणात एका प्रकारची (अ)समृध्द अडगळ निर्माण झालेली आहे. व या अडगळीला पाठिराख्यांचीही कमतरता नाही. कारण आज भारतीय राजकारण पक्षांचे न राहता ते व्यक्तीकेंद्रीत झालेले बघायला मिळते. व प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी प्रचंड राजकीय महत्वाकांक्षा निर्माण होताना दिसून येत आहे. व त्यात गैर असे काही नाही. कारन महत्वकांक्षा असावी पण ती राष्ट्रीय हिताची असावी संकुचीत स्वरुपाची नसावी. पण नेमके भारतात संकुचीत स्वरुपाची राजकिय महत्वकांक्षा निर्माण होताना दिसून येते. त्यामुळे राजकीय (अ)समृध्दतेत वाढच होताना दिसून येत आहे.



**प्रस्तावना :**

खरे तर गेल्या काही वर्षातील, महिन्यातील किंवा दिवसातील भारतातील राजकीय घडामोडींवर कटाक्ष टाकला तर सगळे कसे विविधतेने नटलेले राजकारण बघायला मिळते.प्रत्येक पक्ष असो वा राजकीय नेते सर्वजन आपण कसे इतरांपेक्षा वेगळे आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न करत आहेत. पण त्यामुळे राजकीय क्षेत्रात खुप मोठी वैचारीक गुंतागुंत निर्माण होत आहे. व त्यामुळे त्यांना पाठिंबा देणारे पाठिराखेही संभ्रमात पडले आहे. कोण धर्मनिरपेक्ष,कोण धर्माधिष्ठत,कोण विकासवादी कोण भ्रष्टाचारी यासारख्या लेबलानी आज राजकिय पक्ष किंबहुना राजकिय नेत्वृव ओळखले जावू लागले आहे. कारण आज राजकीय पक्षांनाही कोणती विचारसरणी स्विकारावी या वरुन संभ्रम निर्माण झालेला दिसतो. कारण आज आपले जनमत टिकवून ठेवण्यासाठी पारंपारीक मुदद्े काहिसे निरपयोगी ठरतांना दिसत आहेत. व त्यामुळे राजकीय पक्षांनाही पुर्णपणे धर्मनिरपेक्ष व पुर्णपणे धर्माधिष्ठित होणे आज जिकिरीचे वाटू लागले आहे. खरे तर भारतीय राजकारणच काहिश्या संभ्रमात पडलेले दिसते. काहिश्या संक्रमन अवस्थेतून वाटचाल करताना दिसते. त्यामूळे जनतेला एकीकडे विकास पुरुष म्हणून सद्य नेत्वृव हवेहवेसे वाटतात. पण दुसरीकडे ते केवळ व्यापारीधार्जीणे आहेत , शेतकरी विरोधी आहेत. म्हणून नकोसे ही वाटते. तिकडे कॉग्रेस बाबतीतही हीच सभ्रंमाची अवस्था जनतेच्या मनात आहे. भ्रष्टाचारी म्हणून त्यांना पदावरुन दूर केले. पण आता भुमीआभिग्रहण असो किंवा इतर काही मुदद्े या बाबतीत ते देखिल हवेहवेसे वाटतात. याचे महत्वाचे कारण म्हणजे भारतीय जनतेत असलेल्या राजकिय पश्नांबदद्लचा, राजकिय व्यवस्थेबदद्लच्या जाणिंवाचा असलेला अभाव होय. कारण आज जनतेत जी राजकिय जागृती होत आहे. त्याला महत्वाचे कारण म्हणजे समाजाच्या तळागाळापर्यत्न पोहचलेली प्रसारमाध्यमे होय. हि प्रसारमाध्यमे आज शासनाच्या प्रत्येक निर्णयावर जनतेत जागृती

घडवून आणण्याचा आव आणताना दिसतात. पण या प्रसारमाध्यमांना देखिल जागतीकिरण व व्यापारीकरणची बाधा काही प्रमाणात झालेली झालेली आहे. त्यामुळे ते आपला टि.आर.पी. वाढेल अशा प्रकारे माहिती पूरवीण्याचे कार्य करतात. काही वेळेस तर त्याचा एकदम नकारात्मक दृष्टीकोन असतो. खरे तर प्रसारमाध्यमांनी तटस्थपणे, निरपेक्षपणे खरी माहिती जनतेपर्यन्त पोहचवून जनतेत प्रबोधन घडवून आणण्याचे महत्वाचे कार्य पार पाडणे महत्वाचे असते. पण त्यात आज कूठेतरी व्यावसायीकता आलेली दिसते. त्यामुळे भारतीय जनतेचे खरे प्रबोधन घडूनच येत नाही. खरे तर जनतेत राजकिय प्रगल्भता येण्यासाठी जनतेला राजकिय व्यवस्थेविषयी सखोल ज्ञान असने आवश्यक आहे. व त्यासाठी प्रसारमाध्यमे चांगली भुमिका पार पाडू शकतात. अन्यथा भारतीय राजकिय प्रक्रीयेतील असमृध्दता दिवसेंदिवस वाढतच जाईल व हे भारतीय समाज व्यवस्थेसाठी घातक ठरु शकते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ज्यावेळी मंत्रीमंडळातील एखादा पदाधिकारी कोणताही विचार न करता एखादे विधान सार्वजनीक ठिकाणी करतात. त्यावेळी त्यांच्या पदामुळे त्या वक्ताव्याला महत्व प्राप्त होते. व त्याचा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रभाव पडत असतो.पण संकूचित राजकीय उद्येशापुढे त्यांना राष्ट्रीय हित कमी महत्वाचे वाटते. अलिकडे मा. पंतप्रधानजींच्या विदेश दौऱ्यांवरती जनसामान्यांमधून, विरोधी पक्षांकडून टिकेचा सुर उमटताना दिसतो. त्यात जनसामन्यांकडून होणारी टिका एक वेळ समजून येवू शकते. कारण त्यांना आंतराष्ट्रीय राजकारणातील अंतर्गत गुंतागूंत महिती नसते. पण विरोधी पक्ष हा एक वेळचा सत्ताधारी असतो किंवा भविष्यातील सत्ताधारी पक्ष असू शकतो. व त्यांना परदेश दौऱ्यांचे महत्व माहित असते. कोणताही देश्याचा प्रंतप्रधान हा holiday tour म्हणून परदेश दौऱ्यांवरती जात नसतो. त्याच्यात काहितरी देशहिताचे धोरण निहित असते. व ते तज्ञ लोकांनी तयार केलेले असते. त्यामूळे सर्रास त्यांच्या धोरणावरती टिका करण्यापेक्षा त्यातील जे काही आक्षेपार्ह असेल त्या बाबींवरती टिका करुन त्याबाबतीत समाजात जागृती घडवून आणली पाहिजे. पण हे होतांना दिसत नाही. कारण आज सर्वच राजकिय पक्षांना सवंग लोकप्रीयेतीची लागण झालेली आहे. त्यामूळे ते फक्त राजकारणासाठी विरोध करतांना दिसतात. त्यामुळे भारतीय राजकारणातील असमृध्दता वाढतच चाललेली दिसते आहे.असे खेदाने म्हणावे लागेल.

त्याचबरोबर आज भारतातील प्रत्येक राजकिय पक्ष हे मान्य करतो कि भारतीय संविधान हे सर्वश्रेष्ठ असुन आम्ही त्याचे पालन करतो. व आमचा राजकिय पक्ष हा घटनेचे पालन करणारा पक्ष आहे हे ते छातीठोक पणे सांगतात. पण मग भारतात धार्मिक बाबतीत काही पक्ष मध्ययूगीन भुमिका घेताना दिसतात. त्यावेळी त्यांना भारतीय घटनेत सांगीतलेल्या धर्मरिपेक्ष तत्वाचा सोईस्करपणे विसर पडलेला दिसतो. त्यामुळे भारतात गेल्या ६६वर्षात आपण एक संघटित भारतीय राष्ट्रवाद असलेला समाज निर्माण करु शकलो नाही हि आपल्या दृष्टीने एक खेदाची बाब म्हणावी लागेल. कारण जो पर्यंत आपण अंतर्गत एकसंध भारत निर्माण करु शकत नाही तो पर्यंत आपण बाहय शत्रूंना हारवू शकत नाही.

आज आपण भारत हा विविधतेने नटलेला देश आहे व या विविधतेचा आम्हाला खुप अभिमान आहे असे खुप अभिमानाने म्हणत असतो. पण या विविधतेत एकता निर्माण करण्यासाठी आपण काही प्रयन्त करतो का? याचा विचार आज प्रत्येक भारतीयांने करण्याची आज खुप गरज आहे. कारण तसे केले नाही तर हि विविधता आपल्यासाठी मोठे संकट बनू शकेल. कारण आज भारतीय समाजात धार्मिक कटट्रता खुप मोठया प्रमाणवर वाढताना दिसते आहे. प्रत्येक जाती, धर्मांत श्रेष्ठतेवरुन चढाओढ लागलेली दिसते. हि असमृध्दता दूर करण्याची गरज आहे.

आज भारतीय राजकारणात एक नविनच प्रवाह आलेला दिसतो तो म्हणजे एकीकडे विकासाच्या, महासत्ता होण्याच्या गप्पा मारायच्या व दूसरीकडे आर्थिक मागासलेपणावर आरक्षणाची मागणी करायची. आज समाज व्यवस्थेत जे वर्ग दिर्घकाल सत्तेत वाटेकरी राहिले आहेत ते आज आर्थिक निकषांवर आरक्षणाची मागणी करत आहेत. तीच बाब घटकराज्याच्या बाबतीतही दिसून येते. आज बहुतेक घटकराज्यांचे नेतृत्व एकीकडे आम्ही खुप विकास केला अशी वल्गना करतात व दूसरीकडे मात्र केंद्राकडून खास राज्याचा दर्जा मिळावा म्हणून प्रयत्नही करताना दिसतात. अशा प्रकारची एक असमृध्द अडगळ भारतीय राजकारणात बघायला मिळेल.

अशा प्रकारे आज भारतीय समाज म्हणजे एक प्रकारची असमृध्द अडगळ झालेला आहे. व हि असमृध्द अडगळ जर आपणाला समृध्द बनवायची असेल तर आपणाला वैचारीक, राजकिय दृष्टया प्रगल्भ व्हावे लागेल. तरच खऱ्या अर्थाने भारतीय समाज विविधतेत एकता असणारा व राजकारणाची एक समृध्द अडगळ असलेला राजकिय दृष्टया समृध्द समाज बनेल यात तिळमात्रही शंका नाही.

*संदर्भसूचीः–*

समाज प्रबोधनपत्रिका,
परिवर्तनाचा वाटसरु,
साधना,
योजना,
लोकराज्य,
Economics and political Weekly,b .
वृत्तपत्रातील लेख :
लोकसत्ता,
सकाळ,
लोकमत,
टाईम्स ऑफ इंडिया इ वृत्तपत्रांतील लेखांचा उपयोग केला आहे.
इंटरनेट : www.Google.com

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org